ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 11 | ISSUE - 9 | MAY - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# पर्यटन दृष्टिकोनातून बुलढाणा जिल्ह्याचे ऐतिहासिक महत्व एक अभ्यास



प्रा .डॉ .युवराज गुंडू सुरवसे[1] , रुख्मिणी दत्तात्रय जोशी[2]
[1](एम.ए.बी.एड सेट पीएच .डी.) छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स ,सोलापूर.
[2](एम.ए., बी.एड. ) छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स ,सोलापूर

## प्रस्तावना :-

प्रादेशिक आणि स्थानिक इतिहास लेखन म्हणजे भौगोलिक दृष्ट्या विशिष्ट प्रदेशातील इतिहासाचा अभ्यास.यात इतिहासाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक पैलूंचा समावेश असतो.

स्थानिक इतिहास म्हणजे भौगोलिक दृष्ट्या स्थानिक संदर्भात इतिहासाचा अभ्यास जो बहुतेकदा तुलनेने लहान स्थानिक समुदायावर केंद्रित असतो . त्यात इतिहासाचे सांस्कृतिक आणि सामाजिक पैलू समाविष्ट आहेत स्थानिक इतिहास हा केवळ राष्ट्रीय इतिहास नाही तर दिलेल्या भौगोलिक क्षेत्रातील भूतकाळातील घटनांचा अभ्यास आहे जो विविध कागदोपत्री पुराव्यांवर आधारित आहे आणि प्रादेशिक आणि राष्ट्रीय अशा तुलनात्मक संदर्भात ठेवला आहे.

ऐतिहासिक फलक हे भूतकाळातील महत्त्वाच्या घटनांचे दस्तऐवजीकरण करण्याचे एकरूप आहे आणि मौखिक इतिहास हे दुसरे रूप आहे. स्थानिक इतिहासाचे दस्तऐवजीकरण बहुतेकदा स्थानिक ऐतिहासिक संस्था किंवा स्थानिक ऐतिहासिक इमारत किंवा इतर ऐतिहासिक स्थळ जतन करण्यासाठी तयार होणाऱ्या गटांद्वारे केले जाते .स्थानिक इतिहासाची अनेक कामे स्वतंत्रपणे काम करणाऱ्या हौशी इतिहासकारांनी किंवा विविध संस्थांनी नियुक्त केलेल्या अभिलेखागारांनी संकलित केली आहेत.स्थानिक इतिहासाचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे विशिष्ट क्षेत्रांशी संबंधित स्थानिक किंवा राष्ट्रीय नोंदणी मध्ये जतन केलेल्या कागदपत्रांचे प्रकाशन आणि सूचीकरण.

अनेक देशांमध्ये स्थानिक ज्ञानाची एक व्यापक संकल्पना ज्ञात आहे, जी एका विशिष्ट परिसराशी संबंधित प्रत्येक गोष्टीचा व्यापक अभ्यास आहे; इतिहास,वांशिकता, भूगोल ,नैसर्गिक इतिहास इ.स्थानिक इतिहास लेखन हे भौगोलिक दृष्ट्या स्थानिक संदर्भात इतिहासाचा अभ्यास असतो .आधुनिक युगात प्रादेशिक व स्थानिक ऐतिहासिक घटनांचे समग्रपणे अध्ययन करणे स्थानिक इतिहास या लेखन संकल्पनेमुळे शक्य झाले आहे .आणि म्हणूनच मी माझ्या शोधनिबंधासाठी बुलढाणा जिल्ह्यातील लोणार सरोवर हे एक पर्यटन स्थळ निवडले आहे.

वैश्विक इतिहासामध्ये भारताचा राष्ट्रीय सांस्कृतिक वारसा टिकविण्यासाठी स्थानिक इतिहासाची जोपासना करणे आवश्यक आहे.हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून प्रस्तुत शोध निबंधाची निवड करण्यात आली आहे.

लोणार हे बुलढाणा जिल्ह्यातील तालुक्याचे ठिकाण असून लोणार चा उल्लेख प्राचीन काळातील पद्मपुराण ,स्कंदपुराण, आणि विराजमहात्म्य या ग्रंथामध्ये आलेला आहे.या ठिकाणाला विष्णू गया असेही म्हणतात.मधल्या काळातील विस्तृत वर्णनानुसार एका ज्वालामुखी उल्कापातांपासूनसरोवर निर्माण झाल्याचे सिद्ध झाले आहे .याठिकाणी संदर्भात एक आख्यायिका सांगण्यात येते की लवणासुर नावाचा एक राक्षस या ठिकाणी वास्तव्य करू लागला आणि मानवी जीवनाला नष्ट करण्याची त्याची इच्छा होती .म्हणून भगवान विष्णू ने त्याला ठार मारले आणि त्या राक्षसापासून लोणारच्या जनतेला मुक्त केले. मध्ययुगीन कालखंडामध्ये लोणार येथे सातवाहनांचे वास्तव्य असून हे ठिकाण त्यांचे पोस्ट होते यादव काळामध्ये लोणार

हे महत्त्वाचे ठिकाण असून उल्कापाताचे केंद्र होते .लोणार सरोवरामध्ये मोठ्या प्रमाणात मीठ तयार करण्यात येत होते .तसेच तेथे साबण तयार करण्याचा कारखाना असल्याचे वर्णन 'ऐने -ए-अकबरी ' यात केलेली आढळते. लोणार सरोवरामध्ये मोठ्या प्रमाणात मीठ तयार होत असल्यामुळे व तेथून मिठाचा वापर होत असल्यामुळे लोणार हे नाव पडले असावे कारण लवण या शब्दाचा अर्थ मीठ असून हे मिठाचे व्यापारी केंद्र होते म्हणून या ठिकाणाला लोणार म्हणण्यात येत असावे.

लोणार सरोवराच्या परिसरात अनेक मंदिरांचा समूह असून स्मारके,कुंड, बारव मोठ्या प्रमाणात आहेत त्याचा अभ्यास सविस्तरपणे करण्याचा प्रयत्न असणार आहे.

- उद्देश :

1. लोणार सरोवराची निर्मिती कशी झाली हे स्पष्ट करणे.
2. सरोवर परिसरातील कुंडाची माहिती घेणे.
3. लोणार सरोवर परिसरातील मंदिरांची माहिती घेणे.
4. लोणार येथील दैत्यसुदन मंदिराचा अभ्यास करणे .
5. जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ म्हणून लोणार सरोवराचे महत्त्व स्पष्ट करणे.

- लोणार सरोवराची निर्मिती :

पूर्वी लोणार सरोवर हे ज्वालामुखी प्रमाणेच भूगर्भीय प्रक्रियेमुळे निर्माण झाले असे मानले जात होते. पण नंतरच्या काळात ते एक अति वेगवान धूमकेतू किंवा उल्का तिथे आदळल्याने ते निर्माण झाले असे सिद्ध झाले. तिथे प्लँगिओक्लेज नावाचे खनिज सापडले आहे. हे खनिज एकतर मास्केलिनाइटमध्ये रूपांतरीत झाले आहे किंवा त्याच्यामध्ये प्लॅनर डीफार्मेशन वैशिष्ट्ये आहेत. असे फक्त अतिवेगवान वस्तूच्या आघातामुळेच होऊ शकते. त्यामुळे सरोवराची निर्मिती उल्केमुळे झाली यावर शिक्कामोर्तब झाले आहे.

सरोवराचा आकार काहीसा अंडाकृती आहे .उल्का पूर्वेकडून 35 ते 40 अंशाच्या कोनाने आली आणि आदळली.सरोवराच्या वयाचे अनेक अंदाज वर्तवण्यात आले आहेत सरोवराचे वय ठरविण्यासाठी दोन पद्धती वापरल्या गेल्या आहेत . धर्मोल्युमिनेसेन्स विश्लेषणातून असे दिसून येते की सरोवराचे वय 52000 वर्षे जुने असावे आणि दोन्ही बाजूंनी 6000 वर्षांच्या सुधारणेसह पसरले पाहिजे ;तर कार्बन डेटिंग सिस्टीम वरून असे दिसून आले की कार्टरची स्थापना सुमारे 5,70,000 वर्षांपूर्वी झाली होती आणि दोन्ही बाजूंनी 47000 वर्षांच्या दुरुस्त्या आहेत .

लोणार विवर सरोवर हे बेसाल्ट खडकात तयार झालेले सर्वोत्तम संरक्षित आणि सर्वात तरुण कार्टर आहे.

- सरोवर परिसरातील कुंडाची माहिती :

सरोवराच्या परिसरात गायमुख मंदिर हे सर्वात विशाल मंदिर आहे. हे ज्वालामुखी तलावाच्या कडेला वसलेल्या मंदिर समूहातील सर्वात मोठे मंदिर आहे . त्यालाच लोक धार मंदिर किंवा गायमुख कुंड असेही म्हणतात .त्यामधून नैसर्गिकरित्या भूमिगत पाण्याचा प्रवाह हा अनेक वर्षापासून वाहत आहे आणि ते धार्मिक लोकांचा विचार करून बनवलेले आहे.त्यामधील अविरत चालणारा पाण्याचा स्त्रोत उभ्या उतरणेतील रचनात्मक आकार 13 व 14 व्या शतकातील आहे. या मंदिराच्या आजूबाजूच्या परिसरात अजूनही काही मंदिरे बांधलेली आहेत.सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या कुंडांची मापे टोकापासून तळापर्यंतची मापे उत्तर दक्षिण 40.99 मीटर आणि पूर्व पश्चिम 38.24 मीटर असून त्यांची उंची 18.22 मीटर उंच आहे .तेथे दोन उंच वटे असून वरच्या भागाला मंदिराची गुंफण आहे तर खालच्या भागाला पायऱ्यांच्या खाली उतरल्यावर तलाव आहे.

गायमुख कुंडाच्या रचनेमध्ये लांब दगडी शिळांचा वापर केलेला आहे .या मंदिराच्या शिखराला आणि मंदिराच्या काही भागाला चुन्याच्या निवळीचा गिलावा दिलेला आहे .त्याच्याखाली पाण्याचे दोन कुंड असून एका कुंडामध्ये स्वच्छ धारेचे पाणी पडते व ते दुसऱ्या कुंडामध्ये साठविले जाऊन त्यामधून वगळून सरोवराला जाऊन मिळते .

- *लोणार सरोवर परिसरातील मंदिरांची माहिती :*

*तलावाच्या सभोवताली मंदिरांची रांग विखुरलेली आहे त्यापैकी नरसिम्हा, गणपती, देवी,कार्तिक स्वामी, पितांबरेश्वर, नारदेश्वर, हटकेश्वर,बालविष्णू, काशी विश्वेश्वर , भगवान चक्रधर ही मंदिरे छोटी छोटी असून त्यामध्ये नरसिंम्हा ,रेणुका , महादेव मंदिर महत्त्वाचे आहेत .*

1. *नृसिंह मंदिर (लोणार) :*

*नृसिंह मंदिर हे नकाशावर L आकाराचे आहे.हे मंदिर गायमुख मंदिर समूहातील असून ते अर्धमंडप ,मंडप अंतराळा आणि गर्भगृहाने बनलेले आहे .या मंदिराच्या अर्ध मंडपाचे उत्तर -दक्षिण भागाचे माप 4.05 मीटर असून पूर्व - पश्चिम 3.85 मीटर आहे आणि 1.75 मीटर खोल आहे.नृसिंह मंदिराच्या मंडपाच्या प्रवेशद्वारावर तीन शाखांमध्ये त्याच्या समोरील भागावर काणी उपमाणक तुळईवर असून मधल्या शाखेमध्ये विष्णूची शिल्पाकृती कोरलेली आहे आणि कोपऱ्यातील त्रिकोणी भागावर पाने,फुले ,वेली आहेत. तिसऱ्या शाखेमध्ये पहिल्या शाखेप्रमाणेच व्यवस्थापन केलेले आहे.*

*गर्भगृहाचे प्रवेशद्वार हे साध्या पद्धतीचे आहे.त्यावर तीन शाखांनी युक्त कोरीव काम केलेले असून त्या मंडपाच्या द्वाराप्रमाणेच आहेत .गर्भगृहाच्या दरवाज्याच्या उभ्या पॅनलवर लक्ष्मी आणि पार्वती यांच्या छोट्या -छोट्या आकाराच्या प्रतिकृती प्रक्षेपित केलेल्या आहेत .त्याच्या दुसऱ्या बाजूवर दोन हत्ती पाण्याचे फवारे उडवितांना प्रक्षेपित केलेले आहेत .हत्तीच्या पाठीमागे त्या हत्तीचा माहुत उभा आहे .तेथे भद्रपिठावर नृसिंह भगवानाची प्रतिमा विधीपूर्वक स्थापलेली दिसते.*

2. *रेणुका देवी मंदिर (लोणार ):*

*रेणुका देवी मंदिर हे नृसिंह मंदिराच्या दक्षिणेला बांधलेले असून अर्धमंडप,मंडप आणि गर्भगृह यांनी बनलेले आहे. या मंदिराचा मंडप आयताकृती असून त्याचे माप (6.75 x 4.30) मीटर असून त्याला चार खांब आहेत .बाजूच्या भिंती सपाट आहेत . दिवाणखान्याकडे जाणाऱ्या लहान खोलीची तरतूद स्पष्ट करता येत नाही .मंडपाच्या प्रवेशद्वारावर तीन शाखांच्या प्रतिकृती कोरलेल्या आहेत .त्यामध्ये ललाटबिंबावर गणेशाची शिल्पाकृती कोरलेली आहे .प्राचीन भद्रपिठावर देवीची शिल्पाकृती कोरलेली आहे.*

*अर्धमंडप,मंडप आणि गर्भगृहाचे छत साध्या पद्धतीचे आहे .त्यावर दगडी छत टाकलेले आहे. मंडपाचे संपूर्ण खांब घडविलेले असून त्याचा पाया आयताकृती आहे. सर्व खांब हे अष्टकोनी असून त्यावर रामायणातील शिल्पे आहेत .एका शिल्पात सुग्रीवाच्या सेनापतीशी राम - लक्ष्मण चर्चा करीत आहे .दुसऱ्या शिल्पात शुक्राचार्याची तपस्या भंग करण्याकरिता मेनका आलेली आहे .बालीला राम बाण मारत आहे .कृष्ण यशोदेला लोणी मागत आहे .गोवर्धन कृष्णाने उचललेला आहे. तर भिंतीवर शिव पार्वती शिल्प आहे .मंदिराचे द्वारपाल जय आणि विजय आहे.सोबत बौद्धांचे चक्रपाणि व पद्मपाणि हे आहेत.बाहेर स्तंभावर समुद्रमंथन शिल्प व कामशिल्पे आहेत .अशोक वाटिकेतील सीता, राम-रावण शिल्पयुद्धाचे चित्र दशरथाच्या बाणाने गतप्राण झालेला श्रावणकुमार आणि शिकारीचे चित्र कोरलेले आहे .*

3. *महादेव मंदिर (लोणार) :*

*रेणुका मंदिराच्या दक्षिणेला चौरसाकृती व्यासपीठ असून त्याला वर्तुळाकृती गर्भगृह आहे .त्या गर्भगृहामध्ये योनी पिठावर शिवलिंगाची स्थापना केलेली आहे .या मंदिराच्या भिंती पडलेल्या असून छत नाहीसे झालेले आहे .*

4. *पापहरेश्वर मंदिर (लोणार) :*

*हे मंदिर शिवाला समर्पित असून लोक त्याला पापहरेश्वर मंदिर म्हणतात .त्याची लांबी, रुंदी,उंची ( 8.32 x 6.75 x 4.60) मीटर असून हे मंदिर हेमाडपंथी पद्धतीने बेसाल्ट खडकापासून बांधलेले आहे .या मंदिराच्या डाव्या बाजूला खोल दरी असून गायमुख मंदिर समूहातील हे एक मंदिर आहे.येथे मंदिराचा मोठा समूह आहे. त्यामधील हे छोटेसे मंदिर आहे.या मंदिराला नंदीमंडप आणि पुष्करणी शोभा आणतात.या मंदिराच्या प्रवेशद्वारावर शिवाच्या वेगवेगळ्या आकृत्या रेखाटलेल्या आहेत .*

5. कुमारेश्वर मंदिर (लोणार) :

हे मंदिर शिवाला समर्पित असून त्याला कुमारेश्वर असे म्हणतात .हे मंदिर हेमाडपंथी पद्धतीने बेसाल्ट या खडकापासून बांधलेले आहे . या मंदिराला सर्व बाजूंनी कुंपण घातलेली भिंत 1.5 मीटर जाडीची असून त्याचे प्रवेशद्वार हे उत्तरेला आहे .हे मंदिर गर्भगृह , अंतराळा ,मंडप आणि अर्धमंडप यांनी बनलेले आहे या मंदिराचा दर्शनी भाग हा पश्चिमेला आहे .मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या चौकटी ह्या अतिशय चांगल्या प्रकारे सुशोभित केलेल्या आहेत .येथील मंडपाचे वर्तुळाकार व्यासपीठ उभारलेले असून त्याच्या कडेला आठ खांब आहेत .या मंडपाच्या छतावर कमळाचे कोरीव काम केलेले आहे.

त्या छताची बांधणी तिबेटियन पद्धतीने केलेली आहे .येथील मंडपाच्या छतावर अतिशय कौशल्याने कोरीवकाम केलेले असून त्याचा पाया अष्टकोनी आहे .त्या अष्टकोनी खांबावर हत्तींच्या रांगा , घोडे , हत्तीस्वार आणि युद्धाची शिल्पाकृती रेखाटलेली आहे.

6. याजणेश्वर मंदिर (लोणार) :-

एकमेव शिवमंदिर तलावाच्या कडेला असून या मंदिराची लांबी, रुंदी आणि उंची (20.03 x9.38 x4.58 )मीटर आहे .हे मंदिर शिवाला समर्पित असून त्याला याजणेश्वर मंदिर असे म्हणतात .हे मंदिर गर्भगृह, अंतराळा ,मंडप आणि अर्धमंडप यांनी बनलेले असून या मंदिराला तीन द्वार मंडप आहेत .मंदिरामध्ये गर्भगृहाचे व्यासपीठ हे उंच बांधलेले असून या मंदिराचे प्रवेशद्वार पश्चिमेला आहे .गर्भगृहामध्ये व्यासपीठाच्या मध्यभागी योनी पिठावर शिवलिंग स्थापन केलेले आहे

7. रामगया मंदिर (लोणार ) :

विष्णू मंदिरालाच रामगया मंदिर असे म्हणतात.या मंदिराची लांबी,रुंदी आणि उंची (16.99x13.33 x 6) मीटर असून हे मंदिर उंचावरील अद्वितीय स्थळ आहे .तेथे गेल्यास जमिनीची पातळी आणि तलाव एकत्र झाल्यासारखे दृश्य दिसते . इतर मंदिरापेक्षा या मंदिराची स्थिती चांगली आहे .

8. महादेव मंदिर (लोणार) :

महादेव मंदिर हे रामगया मंदिराच्या उत्तर दिशेला वसविलेले आहे हे मंदिर अंतराळा ,गर्भगृह, मंडप आणि अर्धमंडप यांनी बनलेले आहे . मंदिराचे मुख्य प्रवेशद्वार पश्चिमेला आहे. मंदिराच्या गर्भगृहाच्या प्रवेशद्वार पाच शाखांनी युक्त असून त्यावर गंधर्व ,किन्नर, किर्तीमुख घाटपल्लव वृतिकाशाखा आहेत .त्यांच्या वरच्या भागावर पार्वतीच्या आकृती प्रदर्शित केलेली असून त्याच्या बाजूला छोट्या -छोट्या देवतांच्या आकृत्या आहेत

9. विष्णू मंदिर (बगीचा मंदिर-लोणार):

विष्णू मंदिर हे रामगया मंदिराच्या उत्तर दिशेकडील टेकडीच्या खाली वसविलेले आहे. हे मंदिर विष्णुला समर्पित आहे त्याला बगीचा मंदिर असेही म्हणतात.त्याचे प्रवेशद्वार उत्तर दिशेला असून अंतराळा ,गर्भगृह, मंडप आणि अर्धमंडप यांनी बनलेले आहे . त्याला तीन द्वारमंडप आहेत त्याच्या भग्न अवशेषांवरून असे दिसते की ते कमी उंचीच्या खांबावर बांधलेले आहे.

10. वाघमंदिर (शिवमंदिर लोणार) :

वाघ मंदिर हे बगीच्या मंदिराच्या उत्तरेला असून बाकीच्या मंदिराच्या मध्यभागी वसलेले आहे .या मंदिराला वाघ मंदिर असे म्हणतात कारण पूर्वी या परिसरात वाघांचे वास्तव्य जास्त होते. हे मंदिर जंगलामध्ये असल्यामुळे वाघांची संख्या फार होती . सद्यस्थितीत ते मोडकळीस आलेले आहे.

11. मोर मंदिर (लोणार):

मोर मंदिर हे वाघ मंदिराच्या पश्चिमेला स्थापन झालेले असून त्याला मोर मंदिर असे म्हणतात .मोर मंदिराची लांबी, रुंदी आणि उंची (15.24 x8.16 x4.21 )असून हे मंदिर सरोवराच्या कडेला वसलेले आहे .हे मंदिर जंगल परिसरामध्ये असून तेथे अनेक मोर वास्तव्य करतात त्यामुळेच त्याला मोर मंदिर असे म्हणतात .

12. कमळजा देवी मंदिर (लोणार):

कमळजादेवी मंदिर हे मोर मंदिराच्या पश्चिमेला आहे.इतर मंदिराप्रमाणेच लोक याला देवी मंदिर म्हणून ओळखतात. हे मंदिर गोड पाण्याच्या झऱ्याजवळ वसविलेले आहे. या मंदिराची पुनर्बांधणी झालेली आहे .प्रवेशद्वाराच्या चौकटी शिवाय येथे कसल्या प्रकारचे अवशेष शिल्लक नाही .

13. अंबरखाना मंदिर (लोणार ):

देवी मंदिराच्या पश्चिमेला वसलेल्या मंदिराला अंबरखाना मंदिर असे म्हणतात .ते सध्या मोडकळीस आलेल्या स्थितीत असून त्याच्या पूर्वेकडील आणि उत्तरेकडील भाग खाली पडलेला आहे .मंदिरातील खांबाची चौकोनी बैठक ही वर उचललेली असून पूर्व , उत्तर आणि दक्षिणेकडे तीन प्रवेशद्वार आहेत .मंदिराच्या अंतराळा ,मंडप यांचे छत तिबेटियन पद्धतीने बांधलेले असून मधल्या छतावर कमळाकृती फुलं कोरलेली आहेत.

14. मंगला मंदिर (लोणार):

मंगला मंदिर हे अंबरखाना मंदिराच्या उत्तरेला असून ते मोडकळीस आलेले आहे . मंदिराचे मंडप , खांब , अर्धमंडप हे भग्नावस्थेत असून पूर्ण भागांपैकी अंतराळा आणि गर्भगृह यांची मापे घेतलेली आहेत ती अंतराळा (1.20 x 1.75 )मीटर आहे .मंदिराची दक्षिणेकडील भिंत पडलेली असून त्यावर कसलेही नक्षीकाम नाही .मंदिराच्या द्वाराच्या चौकटीवर पाच शाखांनी युक्त काम केलेले आहे .परंतु सद्यस्थितीत तेथे काहीच दिसण्यासारखे नाही .

15. देशमुख मंदिर ( लोणार ):

मंगला मंदिराच्या दक्षिणेला उत्तर दिशेला देशमुख मंदिर वसलेले आहे .या मंदिराच्या भिंती आणि अर्धमंडप खाली पडलेला आहे .मंदिराचा मंडप अंतराळ आणि गर्भगृह मंडप यांचे बाहेरील छत हे तिबेटियन पद्धतीने बांधलेले असून त्याच्या मध्यभागी कमळाचे पदक कोरलेले आहे .

- लोणार येथील दैत्यसुदन मंदिर :

हे मंदिर चालुक्यकालीन असून गावाच्या मध्यभागी विशाल जागेवर टेकडीचे उत्खनन केल्यावर याचा शोध लागला .हे मंदिर वास्तुशिल्पाचा उत्कृष्ट नमुना आहे . याचे मुख्य द्वार पूर्वाभिमुख असून सध्या त्याच्यापुढे नगरपालिकेची इमारत आहे .या मंदिराचा आकार अनियमित ताऱ्यांसारखा आहे .हे मंदिर इ.स. 1241 पूर्वीचे असावे . नवीन संशोधनानुसार हे मंदिर उत्तर चालुक्य राजा विक्रमादित्य सहावा म्हणजे विजयादित्य याने त्याच्या पत्नीच्या आग्रहास्तव त्रिभुवन कीर्ती नावाच्या शिल्पज्ञांच्या आराखड्यानुसार बांधलेले आहे .अशाच प्रकारचे मंदिर कर्नाटकातील हलेबीड बेलूर येथील चन्नाकेशव मंदिरासारखे आहे . या मंदिरावरील कोरीव काम पाहून मन अतिशय प्रसन्न होते .जिथे दृष्टी टाकावी तिथे नक्षीकाम आहे .

त्यामध्ये भगवान विष्णू,राम,कृष्ण , , भैरव , सरस्वती इत्यादी देवतांच्या मूर्ती कोरलेल्या होत्या .

मंदिराला तीन अर्धमंडप असून त्याचे व्यासपीठ एकसारख्या आकाराचे नाही . मंदिराचा मंडप साधा असून त्याचे माप (8.75 x8.75 )मीटर आहे .आतील मंडपाची पुनर्बांधणी मराठा कालखंडामध्ये विटांनी केलेली आहे . मंडप हा तीन खांबांनी बनलेला असून त्याच्या चारही बाजूंना छपाई केलेली आहे .परंतु खांबाचा किंचित भाग बाहेर आलेला दिसतो .या मंदिराचे मध्यभागी असलेले व्यासपीठ पूर्णपणे झाकलेले असून त्यासोबत चार खांबांची सुद्धा पुनर्बांधणी केलेली दिसते.

मंदिराच्या गाभाऱ्यातील देवता ही विष्णू असून ती अलीकडच्या काळामध्ये स्थापन केलेली आहे.संपूर्ण मंदिराच्या बाहेरील भिंती या सुशोभित केलेल्या आहेत . मंदिराच्या द्वारमंडपावर छोट्या प्रतिकृती प्रक्षेपित केलेल्या आहेत. आणि त्याला भिंतीच्या कोप-याचा आधार दिलेला आहे .त्यावर तीन मूलभूत तत्वावर आधारित कोरीव काम केलेले असून मागील बाजूला

सूर्याच्या प्रतिमेचा समावेश आहे .एका बाजूला देवी देवतांचा समावेश केलेला आहे आणि तिसरी जागा रिकामी आहे त्यामध्ये लोखंडी जाळीच्या खिडकीप्रमाणे तो भाग सजवलेला आहे .

हे मंदिर विदर्भ प्रांतातील सर्वात सुंदर मंदिर आहे.

- जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ (लोणार सरोवर) :

लोणार सरोवर हे भारतातील महाराष्ट्र राज्यामधील बुलढाणा जिल्ह्यातले खाऱ्या पाण्याचे जगातील तिसऱ्या क्रमांकाचे सरोवर आहे. अमेरिकेतील स्मिथसोनिअन संस्था (U.S.A),युनायटेड स्टेटस जिओग्राफिकल सर्व्हे तसेच भारतातील जिओलॉजीकल सोसायटी ऑफ इंडिया, फिजिकल रिसर्च लॅबोरेटरी ,इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी खरगपूर (इंडिया) यासारख्या संस्थांनी या सरोवरावर बरेच संशोधन केले आहे .आता महाराष्ट्रातील नांदूर मधमेश्वर नंतर 'लोणार सरोवर ' हे दुसरे पाणथळ स्थळ ठरले आहे. महाराष्ट्राच्या सात आश्चर्यापैकी लोणार सरोवर हे एक आश्चर्य ठरले आहे .

## सारांश :-

भारतीय पर्यटन स्थळांचे जतन व संवर्धन ही काळाची गरज आहे. भारत देशातल्या महाराष्ट्र राज्यातील बुलढाणा जिल्ह्यातील लोणार सरोवराच्या जतनासाठी व संवर्धनासाठी लोणार विवर हे वन्यजीव अभयारण्य म्हणून घोषित केले आहे तसेच या परिसरात अंदाजे बाराशे वर्षापूर्वीची जुनी मंदिरे आहेत .त्यातील 15 मंदिरे सरोवरात (विवरात) आहेत. तर आणखी काही मंदिरे आजूबाजूच्या परिसरात आहेत देश- विदेशातून पर्यटक या ठिकाणी येत असतात.

## संदर्भ सूची :


1. बुलढाणा जिल्हा गॅझेटीअर
2. बुगदाने सुधाकर, लोणार दर्शन
3. हेन्री कझिन्स यांनी भारतीय पुरातत्वीय संरक्षण संस्थेअंतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील स्थळांचा अभ्यास करून List of Antiquarian Remains in central Provines and Berer1897 हा ग्रंथ लिहिला .
4. काळे या.मा.,वऱ्हाडचा
5. बाज पु . द., भारतीय वास्तुकला का इतिहास ,
6. गुप्त चंद्रशेखर : विदर्भ एतिहासिक एवं भौगोलिक पृष्ठभूमी , 1996
7. नारखेडे प्र. श. (प्रकाशक ), प्राचीन विदर्भ व आजचे नागपूर ,अमरावती विद्यापीठ, प्रथम आवृती,8 जून 1996